<u>*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र ६१५/२०२२/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. नंदकुमार रामचंद्र नळदकर,<br>रा. रामकमल, फ्लॅट नं.२, गट क्र. ५००,<br>अशोकनगर, सातपूर, नाशिक,ता.जि.नाशिक. | कार्यालय अधीक्षक (पूर्व विभाग),<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक, ता.जि. नाशिक. |

**<u>सुनावणी दिनांक २३/०२/२०२४</u>**

तक्रारदार यांनी दिनांक १५/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २३/०२/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी अपिलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असून अन्य सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १५/१२/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, दि. १४/०९/२०२२ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन आजपर्यंत माहिती मिळाली नाही.

३) सुनावणीवेळी उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या कार्यालयात प्रभाग क्र.३० मधील सर्वे नं. ८७८/२ माझा प्लॅट नं. २०, मोकळा झाला असुन माझ्या तक्रारीचे निराकरण झाले आहे. तरी सदरील अर्ज निकाली काढणेबाबत हरकत नाही असे लेखी दिले असुन त्याची प्रत आयोगास सादर करीत आहे.

४) आयोगासमोर उपलब्ध कागदपत्रे व युक्तीवाद विचारात घेता, तक्रारदार यांच्या लेखी निवेदनाची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१/०२/२०२४ रोजीच्या अहवालासोबत सादर केलेली नाही. त्यामुळे त्यांचे म्हणणे गृहित धरता येणार नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत कोणतीही माहिती/उत्तर दिलेले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्तीची कार्यवाही का करण्यात येवु नये याचा खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. दिनेश प्रभाकर साळी, यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२) प्रस्तुत तक्रार क्रमांक. ६१५/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र 341-2024 30/08/2024